Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2601S01V14P051

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

# सत्यशोधक चळवळ: काल आणि आज

**प्रदीप गणपतराव शेंडे**
संशोधक विद्यार्थी
समाजशास्त्र विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,
नागपूर विद्यापीठ, नागपूर
Email Id. pradeepnilsuman@gmail.com,
Mob No. 9422541945

**सारांश :**
महात्मा फुलेंच्या मार्गदर्शनाखाली सत्यशोधक चळवळीच्या कार्याला गती मिळाली. तत्कालीन परिस्थितीत पेशवाईनंतर स्त्री-शुद्रातिशुद्र यांची परिस्थिती फारच बिकट व नैसर्गिक हक्क व अधिकार नाकारणारी होती. याचे चटके स्वत: जोतीबांनी भोगले. शालेय जीवनात उच्चवर्णीय मित्राच्या निमंत्रणावरून त्याच्या लग्नात ते सहभागी झाले असता त्यांचा अपमान करण्यात आला. त्याची सल त्यांच्या बालमनाला स्वस्थ बसू देत नव्हती. त्यामुळेच त्यांनी धर्मावर आधारीत विषमतावादी व्यवस्थेविरुद्ध एल्गार पुकारला मानवताविरोधी चातुर्वर्ण्यव्यवस्था व जातव्यवस्था यासाठी कारणीभूत असल्याची त्यांची खात्री पटली. केवळ आर्थिक स्थिती सुधारण्यातून वा धार्मिक, सामाजिक, सांस्कृतीक गुलामगिरीतून स्त्री शुद्रातिशुद्राची सुटका होणार नाही, तर शिक्षणप्रसारातून त्यांना त्यांच्या हक्काचे भान देण्यातून ते साध्य होवू शकेल हे त्यांनी ओळखले. त्यातून सन १८४८ मध्ये पहिली मुलींची शाळा सुरू केली. त्यानंतर अस्पृश्यासाठी शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे, साहित्याद्वारे बहुजनांना गुलामगिरीची जाणीव करून देण्यासाठी १८७३ मध्ये गुलामगिरी, शेतकऱ्यांची दैनावस्था दूर करण्यासाठी १८८३ मध्ये शेतकऱ्यांचा असूड यासह विविध ग्रंथाची निर्मिती करण्यात आली. तसेच सत्सार मधून 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' या शीर्षकाखाली पंडिता रमाबाई व ताराबाई शिंदे यांची बदनामी करणाऱ्या टीकांकारांना चोख प्रत्युत्तर, सत्यशोधक समाजाची १८७३ ला स्थापना करून 'धर्म मानवा भेद नसावे, सत्याने वर्तावे ईशासाठी' हा सत्यावर आधारित सद्‌विचार त्यांनी मांडला. पुढे १८९१ मध्ये सार्वजनिक सत्यधर्म स्थापना करून 'सर्व साक्षी जगत्पती तेथे नकोच मध्यस्थी' अशी रोखठोक भूमिका घेवून 'निर्मिक' ही संकल्पना मांडली व नवा पर्याय दिला. त्याबरोबरच सत्यशोधक चळवळीने स्त्री-दास्य, कामगार यांचे शोषणाविरुद्ध लढा उभारतानाच उद्योग या क्षेत्रात भरीव काम केले आहे. त्याचेच प्रतीबिंब भारतीय संविधानामध्ये समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या तत्वाद्वारे उमटल्याचे आपणास दिसून येते.

**बीज शब्द :** सत्यशोधक व्याख्या, कार्य, सत्यधर्म, सहकारी, स्त्री प्रगती, महिलांचे योगदान, आधुनिक चळवळी, विचार, ज्ञानपंरपरा, प्रासंगितता इ.

**प्रस्तावना :**

सत्यशोधक चळवळीचा आढावा घेत असताना आपणास असे दिसून येते की, सत्यशोधक विचाराची सुरुवात सिंधू संस्कृती पासून झाली असून सिंधु संस्कृती अर्थात सिंधु घाटी संस्कृती इतर अनेक प्राचीन संस्कृतीपेक्षा सामाजिक समानतेला अधिक महत्त्व देत होती. परंतु पुराव्यावरून असे दिसून येते की, समतावादाचे घटक आणि काही स्तरीकरण असलेले समाज, विशेषत: कठोर जन्म-आधारित जातीव्यवस्थेऐवजी व्यवसाय व धार्मिक स्थितीवर आधारित होते. त्यानंतरच्या काळात बौद्ध धम्म व जैन धर्माने आर्यांनी लादलेली चौकट मोठ्या प्रमाणात मोडली आहे. हाच आदर्श स्वीकारून सम्राट अशोकाने समतावादी नागरी समाज निर्माण करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्यामुळेच अशोक स्तभांतील 'सत्यमेव जयते' सत्याची प्रेरणा देत असल्याने, संविधान सभेने अधिकृतरित्या या घोषवाक्यास मान्यता दिलेली आहे.

सामाजिक सुधारणेकडे वळण्यासाठी महात्मा फुलेंच्या संदर्भात एक घटना प्रामुख्याने कारणीभूत ठरली, ती म्हणजे बालपणी महात्मा फुले ब्राह्मण मित्राच्या लग्न वरातीत सामील झाले व वरातीसोबत चालले होते त्यावेळेस तत्कालीन कर्मठ ब्राह्मणांनी जोतीरावांना वरातीतून अपमानित करून बाहेर काढले. त्यावेळेस त्यांचा स्वाभिमान जागृत होऊन त्यांना समाज व्यवस्थेविषयी अनेक प्रश्न पडले. जर स्त्री-शुद्रातिशूद्रांची यातून सुटका करायची असेल तर शिक्षणाचा प्रचार-प्रसारातूनच ती होवू शकते. मात्र हे साकार करावयाचे असेल, तर जोपर्यंत बहुजनांना हक्कांची जाणीव करून दिली जाणार नाही, तोपर्यंत हे उद्दिष्ट साध्य करणे अशक्यप्राय आहे.

ज्यावेळेस महात्मा जोतीराव फुले यांचे वडील गोविंदराव फुले यांनी सन १८४१ मध्ये स्कॉटिश मिशनरी शाळेत शिकायला पाठवले, त्यावळेस त्यांनी शिवाजी महाराज, जॉर्ज वॉशिंग्टन, मार्टिन ल्युथर किंग आदी महापुरुषांच्या चरित्राचा अभ्यास केला. त्यासोबतच थॉमस पेन यांच्या 'राइट्स ऑफ मॅन' या ग्रंथातील विचारांचा प्रभाव त्यांच्यावर पडला.

त्यासाठी प्राथमिक शिक्षण मोफत सक्तीचे व सार्वत्रिक झाले पाहिजे, अशी मागणी १३० वर्षांपूर्वी देशात सर्वप्रथम करणारे ते द्रष्टे महात्मा होते. १८८२ साली ब्रिटिश सरकारने नेमलेल्या अखिल भारतीय पातळीवरील हंटर शिक्षण आयोगासमोर त्यांनी लेखी स्वरुपात ही मागणी केली होती. देशात शिक्षण हक्क कायदा २०१० पासून लागू करण्यात आला असून त्यामुळे देशभर संपन्न शैक्षणिक पर्यावरण उभे राहत आहे. याचेच प्रतिबिंब भारतीय संविधानात उमटले आहे. या पार्श्वभूमीवर सत्यशोधक चळवळीचे अंतरंग समजून घेण्यासाठी तत्कालीन सामाजिक, शैक्षणिक, कृषि, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीचा आढावा घेणे गरजेचे आहे. या सर्व प्रश्नांची उकल समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या सत्यशोधकी विचाराचे आधारे करण्यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, मासिके वर्तमानपत्रातील लेख, विशेषांक, पाक्षिक इत्यादी द्वितीय स्रोत साहित्याचा वापर करण्यात येईल.

या परिप्रेक्ष्यामध्ये 'सत्यशोधक चळवळ :काल आणि आज' याचा आढावा या शोधनिबंधातून घेण्यात येईल. सर्वप्रथम सत्यशोधक समाज ही संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे.

**व्याख्या:**

सत् म्हणजे खरे शोधक, म्हणजे तपास करणारा आणि मंडळ म्हणजे समाज, अर्थात "सत्यशोधक समाज होय. याचा अर्थ असा आहे की, सर्व मानव निसर्गतः समान असून मानवी कष्ट,मानवी दुःख निवारणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे व त्यासाठी कृतिशील वर्तणूक आणि व्यापक समतावादी दृष्टिकोन अंगीकारून सत्यशोधक समाज परिवर्तनासाठी स्थापन करण्यात आलेली संस्था म्हणजे सत्यशोधक चळवळ होय."

**संशोधन पद्धती : ऐतिहासिक, सांख्यिकीय व वर्णनात्मक पद्धतीचा करण्यात येईल.**

**चर्चा :**

**सत्यशोधक चळवळ स्थापनेचा उद्देश:**

सत्यशोधक समाज स्थापन करण्यामागे उद्देश समजून घेणे गरजेचे आहे. सत्यशोधक समाज स्थापन दिनाच्या अनुषंगाने सत्यशोधक तुकाराम हनुमंत पिंजण मु.किन्हई, तालुका हवेली जिल्हा पुणे यांची अधिकृत विश्वसनीय सविस्तर स्मरण नोंद उपलब्ध आहे. ती नोंद ज्येष्ठ सत्यशोधक डॉ. बाबा आढाव यांनी दीनमित्रकारांचे पुत्र डॉ. रामचंद्र पाटील यांच्या संग्रहातून त्यांच्या  संमतीने १९७७ सालच्या जानेवारी- मार्चच्या 'पुरोगामी सत्यशोधक' च्या अंकात प्रकाशित केली आहे.

त्यानुसार आपल्या साठ सहकाऱ्यांच्या उपस्थितीत २४ सप्टेंबर १८७३ रोजी मूलनिवासी शेतकरी कष्टकऱ्यांसाठी एकदाची सत्यशोधक समाज संघटनेची स्थापना केली. **(उगले, स.च.स.इ., पृ.१४७-१४८)**

**सत्यशोधक समाजाची तत्वे :**

१ एक सर्व मानव समान असून एकाच ईश्वराची लेकरे आहेत.
२.ईश्वर हा सर्वांचा मायबाप आहे, ईश्वर हा निर्विकार असून तो निर्मिक आहे.
३.आईला भेटण्यास अगर बापाला प्रसन्न करण्यास ज्याप्रमाणे मध्यस्थाची जरूरी नसते, त्याप्रमाणे देवाची प्रार्थना करण्यास पुरोहित किंवा गुरूची आवश्यकता नाही.
४.जो नियमित वर्गणी देईल आणि उपरोक्त तत्वे मान्य करेल त्याला सत्यशोधक म्हणता येईल.

वरील तत्वांना भवानी पेठ, पुणे येथे १७ एप्रिल १९११ मध्ये आयोजित सत्यशोधक अधिवेशनात मांडण्यात आलेल्या ठरावाद्वारे  मान्यता देण्यात आली होती. **(कीर, म.जो.फु. पृ.१५९ व उगले, स.च.स.इ. पृ.१६०)**

**समाजाची प्रतिज्ञा:** 'सर्व मानव प्राणी एकाच देवाची लेकरे' आहेत, सबब ती माझी भावंडे आहेत, अशा बुद्धीने मी त्यांच्याशी वागीण, परमेश्वराची पूजा भक्ती अगर ध्यानधारणा करतेवेळी अगर धार्मिक विधीचेवेळी मी मध्यस्थाची गरज ठेवणार नाही, दुसऱ्यांनाही तसेच वागण्याबद्दल मी उपदेश करीन, मी माझ्या मुला-मुलींना सुशिक्षित करीन, मी नेहमी राजनिष्ठेने वागेन, परमेश्वरास व सत्यरुपी परमेश्वरास साक्ष ठेवून मी ही प्रतिज्ञा करीत आहे. या प्रतिज्ञेप्रमाणे वागण्यास मला सामर्थ्य येईल, अशाप्रकारे आयुष्यक्रम गुदरण्यास योग्य प्रकारे मदत तो मला करो.'

महात्मा जोतीराव फुले यांच्या निधनानंतर सत्यशोधक तत्वे व प्रतिज्ञा सार्वजनिक करण्यात आली. त्यानुसार महात्मा फुले यांना निर्मिक अर्थात 'क्रियेटर' हा शब्द अभिप्रेत होता.

**सत्यशोधक चळवळीचा समताविषयक लढा :**

पेशवाई मध्ये स्त्री- शूद्रातिशूद्रांनी जातिव्यवस्थेचे व गुलामगिरीचे चटके सहन केले होते. त्यामुळेच महात्मा फुले यांनी बहुजनांना या गर्तेतून बाहेर काढण्याचा चंग बांधला. त्याची रीतसर मांडणी करण्यासाठी इ. स. १८७३ ला त्यांनी 'गुलामगिरी' या ग्रंथाद्वारे संवादरूपी निबंधवजा ग्रंथाची निर्मिती केली. विशेष म्हणजे महात्मा फुले यांनी हा ग्रंथ 'युनायटेड स्टेट्स' मधील सदाचारी लोकांना त्यांनी गुलामांना दास्यत्वातून मुक्त करण्याकामी जे "औदार्य,

निरपेक्षता व परोपकारी बुद्धी दाखविल्याबद्दल त्यांच्या सन्मानार्थ" अर्पण केले आहे. त्यामुळेच सत्यशोधक समाजाने केशवपनाविरुद्ध मोहीम राबवली. परिणामी नारायण मेघाजी लोखंडे यांनी नाभिक बांधवांना तयार करून संप घडवून आणला.

हिंदूविवाह पद्धतीमध्ये स्त्रियांना अत्यंत अपमानास्पद वागणूक मिळत होती. स्त्री-पुरुष समतेवर आधारित सत्यशोधक विवाह पद्धती सुरू केली. २५ डिसेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजातर्फे सिताराम जबाजी आल्हाट आणि मंजुबाई ज्ञानोबा निंबणकर यांचा पहिला सत्यशोधकी विवाह लावण्यात आला. हे करत असताना कचेऱ्यांचा त्यांना सामना करावा लागला. परंतु त्यावर विजय मिळवत त्यांनी अनेक सत्यशोधक विवाह लावले. **(नरके, म.फु.स.वा., पृ. १२ ते २५, लुलेकर, ब.सं.ज.म.जो.फु., पृ. ८८)**

सत्यशोधक चळवळीने राबविलेल्या विविध उपक्रमामुळेच सावित्रीबाई फुले यांच्या शाळेतील मुक्ता साळवे या चौदा वर्षाच्या चिमुकलेले १८५५ साली लिहिलेला 'महार मागाच्या दुःखाविषयी'चा निबंध विषमव्यवस्थेतील महार मांग आणि स्त्रियांच्या शोषणाविरुद्धचा विद्रोह करणारा ठरला आहे. त्याचप्रमाणे ताराबाई शिंदे यांनी सन १८८३ मध्ये लिहिलेला 'स्त्री पुरुष तुलना' हा ग्रंथ, पुरुषसत्ताक व्यवस्थेविरुद्धचा एल्गार ठरला. संस्कृतच्या विदुषी पंडिता रमाबाई यांनी परंपरानिष्ठ मनुसमर्थकांच्या पुरुषसत्ताक व्यवस्थेवर तर्कशुद्ध कोरडे ओढले. अर्थात स्वतंत्र विचार आणि नव्या विचाराचे भान देण्याचे कार्य महात्मा जोतीराव फुले यांचे मार्गदर्शनात सत्यशोधक चळवळीने केले.

महात्मा फुलेंच्या सत्यशोधक चळवळीतील प्रमुख शिलेदारांमध्ये डॉ. सदोबा गावडे, बंडोबा तरवडे, सरदार दयाजीराव थोरात, देवराव ठोसर, डॉ. विश्राम रामजी घोले, तुकाराम तात्या पडवळ, गोपाळराव वलंगकर, डॉ. संतुजी लाड, कृष्णराव भालेकर, नारायण मेघाजी लोखंडे, आदींचा समोवश आहे.

**१.चातुर्वर्ण्य व अमानवी जातव्यवस्थाविरोधी कार्य:**

भारतातील स्त्री-शूद्रातिशूद्रांची शोषणातून मुक्तता करणे, ही महात्मा फुले यांची प्राथमिकता होती. 'गुलामगिरी' या ग्रंथात त्यांनी याची सविस्तर अशी मीमांसा केली आहे. अठरापगड जातीतील लोकांना 'माणूस' म्हणून जे नैसर्गिक हक्क व अधिकार देणे आवश्यक होते. ते सर्व अधिकार या व्यवस्थेने काढून घेतले होते. अशा परिस्थितीत बहुजनांना हे अधिकार बहाल करण्यासाठी सर्व पातळ्यांवर फुले यांनी अत्यंत तीव्र स्वरूपाचा संघर्ष केला.

आपल्या अखंडात बंधुतेची मांडणी करताना ते म्हणतात,

**"मानवा सारिखे निर्मिकें निर्मिले ॥ कमी नाही केले ॥ कोणी एक**
**कमी जास्त बुद्धी मानवा वोपोली ॥ कोणा नाही दिली ॥ पिढीजादा ॥"**

या त्यांच्या विचारांवरून समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय या वैश्विक मूल्यांची ते भारतीय प्रवक्ते होते हे स्पष्ट होते.

**२) शैक्षणिक कार्य :**

महात्मा फुले यांच्या मार्गदर्शनाखाली सत्यशोधकी चळवळीद्वारे स्त्री-शुद्रातिशूद्रांच्या शैक्षणिक कल्याणासाठी महत्त्वपूर्ण कार्य करण्यात आले आहे. हे करत असताना जात आणि धर्म या पलिकडे जाऊन कोणताही भेदाभेद न मानता सर्व घटकाला शिक्षण मिळावे, ही त्यांची धारणा होती. त्यासाठी फुलेंनी स्वतःच्या सहचारिणीला शिक्षणाचे धडे देऊन १ जानेवारी १८४८ रोजी बुधवार पेठ, पुणे येथे भिडे यांच्या वाड्यात मुलींची पहिली शाळा काढली. त्यामध्ये त्यांची भूमिका अशी होती की, मुलांच्या भवितव्याचे मार्गदर्शन आईच्या माध्यमाने उत्कृष्टरित्या होऊ शकते म्हणून फारार मॅडमच्या अहमदनगरला सावित्रीबाईंना प्रशिक्षणासाठी पाठविले. या कार्यात त्यांना अनेक अडथळे आले. परंतु न डगमगता शिक्षण प्रसाराचे कार्य त्यांनी सुरुच ठेवले. **(बगाडे,म.जो.फु., पृ. ३०)**

शिक्षण विचार केंद्राचे तीन परीघ त्यांनी निश्चित केले.

१. व्यक्ती आणि समूहाला त्यांच्या अस्तित्वासाठी इतिहासाचे परंपरेचे स्वत्वाचे भान देण्यासाठी शिक्षण.
२. अर्जित स्वरूपातील नैसर्गिक आणि भौतिक स्वरूपातील अनुभवी शिक्षण.
३. सामाजिक सांस्कृतिक दृष्टीने माणसातील संबंधाच्या नीतीचे शिक्षण.

वरील तीन परीघांवरून बहुजनांच्या शैक्षणिक दृष्टीचे प्रतिबिंब स्पष्ट होते. **(लुलेकर, ब.स.ज.: म.जो.फु., पृ. ५६-६०)**

**३) शेती, शेतकरी आणि कार्य:**

पेशवाईनंतर शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली होती. ब्रिटिश राजवटीत देखील शेतकऱ्यांची राजकीय स्तरावर कोणत्याही प्रकारची परिस्थिती बदललेली नव्हती. त्या काळात ग्रामीण विभागातील शेतकरी,

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2601S01V14P051
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

शेतमजूर, शूद्र, अतिशूद्र यांच्यावर या वर्गाद्वारे अन्याय अत्याचार केले जात होते. याविरुद्ध त्यांनी शेतकऱ्याचा असूड मधून आसूड ओढले. **(भोळे,म.जो.फु., पृ.३३,३४)**

**४) कामगार कल्याणविषयक कार्य :**

नारायण मेघाजी लोखंडे हे भारतीय कामगार चळवळीचे जनक आहेत. त्यांनी १८८० 'मिल हॅन्ड असोसिएशन' नामक कामगार संघटना स्थापन केली. सत्यशोधक समाजाचे कृष्णाजी केळुसकर, नारायण पवार, रामचंद्र शिंदे यांनी ह्या कामगार चळवळीत सहभाग दिला.

नारायण मेघाजी लोखंडे यांच्या नेतृत्वात कामगार संघटनेच्या मागण्यांना १८९० मध्ये यश मिळाले आणि आठवड्यातून एक दिवसाची रविवारची सुट्टी मिळवून देण्यात आली कामगारांच्या शोषणाविरुद्ध लढण्याची संघर्ष करण्याची प्रेरणा सत्यशोधक समाजाच्या चळवळीतूनच मिळाली, ही सत्यशोधक चळवळीची फलश्रुती असल्याची बाब यातून निष्पन्न होते.

**५) सार्वजनिक सत्यधर्म**

स्त्री-पुरुष समानता, जातिभेदास नकार, माणूस या मूल्यांचा स्वीकार, समान शिक्षणाची समान संधी, उपभोगाचा अधिकार, श्रेष्ठत्त्वाचा अस्वीकार, लिहिणे-वाचणे, बोलणे यासाठीची स्वंतत्रता, मद्यपानास बंदी, सर्वांना न्यायाची वागणूक, शेती करण्याऱ्यास श्रेष्ठ समजणे, धंदा करणाऱ्यास कनिष्ठ इत्यादी सत्यवर्तनाच्या ३३ कलमांची नियमावली महात्मा जोतिराव फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्म याद्वारे दिली. **(लुलेकर, ब.सं.ज.म.जो.फु, १८४)**

**चळवळीत प्रमुख महिलांचे योगदान:**

**सावित्रीबाई फुले:**

सावित्रीबाईंचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी नायगाव तालुका खंडाळा जिल्हा सातारा येथे झाला. त्यांनी महात्मा फुलेंसोबत सहचारिणी म्हणून महात्मा फुलेंच्या मार्गदर्शनात निरक्षर सावित्रीबाईंनी घरीच शिक्षणाचे धडे गिरविले. त्यामुळेच पुणे येथील भिडे वाड्यात १ जानेवारी १८४८ रोजी पहिली मुलींची शाळा सुरू झाली. या शाळेच्या व भारतातील पहिल्या शिक्षिका होण्याचा मान त्यांना मिळाला. त्यानंतर शिक्षिकेचा कोर्स पूर्ण करण्यास त्यांनी प्रवृत्त केले. त्यामुळेच ३ जुलै १८५१ रोजी अण्णासाहेब चिपळूणकर यांच्या वाड्यात स्थापन झालेल्या शाळेत त्यांनी मुख्याध्यापका म्हणून कार्य केले. इ. स. १८५४ मध्ये 'काव्यफुले' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. मुंढवा येथील 'प्लेग बाल रुग्णास' हडपसरच्या माळरानावर उभारलेल्या डॉ.यशवंतराव फुले यांच्या दवाखान्यात पाठीवर नेत असताना त्यांना प्लेगची लागण झाली. त्यातच त्यांचे १० मार्च १८९७ रोजी निधन झाले. हे जग त्या सोडून गेल्या. त्यांच्या बलिदानामुळेच आधुनिक स्त्रीने सर्व क्षेत्रात आपला दबदबा निर्माण केला आहे. **(उगले, स.च.स.इ.,पृ.६२)**

**मुक्ता साळवे:**

त्यामुळे विषमतावादी व्यवस्थेविरुद्ध व त्यांनी निर्माण केलेल्या शोषणाविरुद्ध वैचारिक स्तरावर, सत्यशोधक चळवळीची महत्त्वाची भूमिका शाळातून मांडली जात असल्याचे दिसून येते. याची प्रचिती मुक्ताबाईच्या 'महार मागांच्या दुःखाविषयी' या निबंधातून येते हा निबंध १५ फेब्रुवारी १८५५ आणि १ मार्च १८५५ च्या ज्ञानोदय च्या अंकात दोन भागात प्रकाशित झाला.त्यात मुक्ताबाई म्हणते," आम्ही धर्मरहित आहोत का? असा प्रश्न विचारुन चातुर्वर्ण्याधिष्ठीत व्यवस्थेला त्यांनी हादरे दिले.

**सगुणाबाई क्षीरसागर:**

सगुणाबाई क्षीरसागर या जोतीराव यांच्या वडिलांची म्हणजे गोविंदराव फुले यांची मानलेली बहीण होती. जोतीराव यांची आई चिमणाबाई ही जोतीराव एक वर्षाचे असतानाच मरण पावली. त्यामुळे सगुणाबाईने जोतीरावांचे संगोपन केले व त्यांच्या सार्वजनिक कार्यातही त्यांच्या समवेत हिरीरिने भाग घेतला. सन १८४७ जोतीराव यांनी वानवडी पुणे येथील मागासवर्गीयांच्या शाळेत शिक्षिका होत्या. सावित्रीबाईंनी 'काव्यफुले' या काव्यसंग्रहात आत्याबाईच्या सन्मानार्थ कविता लिहिली आहे. ती अशी आहे,

**आमची आऊ । फार कष्टाळू**
**प्रेमळ होती । होती दयाळू**
**सागर वाटे । उथळ क्षणी**
**आभाळ ठेंगणे । तिच्याहुनी ॥**
**आऊ आमच्या घरी आली**
**एकाहून । पहा बैसली**
**मूर्तिमंत जणू । विद्यादेवी**
**हृदयी आम्ही । तिला साठवी ॥**

https://doi.org/10.69758/GIMRJ/2601S01V14P051
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

वरील महत्त्व विचारात घेता सत्यशोधक चळवळीच्या कार्यकर्त्या म्हणून सगुणाबाई यांचाही सन्मान करणे आपले कर्तव्य आहे.

**फातिमा शेख:**

महात्मा फुलेंनी जानेवारी १८४८ रोजी पुण्यातील भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली. विषमतावाद्यांनी या शाळेला कडाडून विरोध केला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिकवायला त्यांनी सुरुवात केली त्यांच्यासोबत आणखीन एक सहकार्यी होती, तिनेही 'नॉर्मल स्कूल' मध्ये शिक्षकी पेशाचे ट्रेनिंग घेतले होते. तिचे नाव होते फातिमा शेख! परंतु फातिमा शेख विषयी इतिहासात खूप लिहिलं गेलं नाही, तिनेही फारसं लिहून ठेवलं नाही. तिच्याबद्दल लिहून ठेवले असते तर त्यांच्या जीवनावर अधिक प्रकाश पडला असता! तरीसुद्धा सावित्रीबाईंनी लिहिलेल्या एका पत्रामध्ये त्यांचा उल्लेख आढळून येतो. तिचे शंभर वर्षांपूर्वीचे निगेटिव वरून तयार केलेले दुर्मिळ छायाचित्र ज्यामध्ये, सावित्रीबाई फुले आणि सगुणाबाई क्षीरसागर यांच्या शाळेतील दोन विद्यार्थिनी, असे छायाचित्र 'सावित्रीबाई फुले काल आणि कर्तृत्व' संपादक प्रा. मा.गो. माळी, या पुस्तकात दिले आहे. त्याचबरोबर सावित्रीबाईंनी जोतीराव फुले यांना लिहिलेल्या एका पत्रात, फातिमा शेख यांचा उल्लेख आहे. जोपर्यंत या मुस्लिम क्रांतिकारी स्त्रीची भूमिका आपल्यासमोर येत नाही, तोपर्यंत तिच्या कार्यामुळे प्रभावित होऊन मुस्लिम स्त्रिया देखील शिक्षित होईल, अशी अपेक्षा करण्यास हरकत नाही.

**ताराबाई शिंदे**

ताराबाई शिंदे यांनी स्त्री पुरुष तुलना हा ग्रंथ १८८२ साली लिहून पुरुषसत्ताक व्यवस्थेला हादरा दिला. सदरहू ग्रंथात स्त्री-पुरुषांच्या जीवनाची तुलना कोणी केली, याबाबत त्यांनी पुरुषी मानसिकतेवर त्यांच्या ग्रंथातून प्रखरपणे कोरडे ओढले आहे. त्यामुळेच त्या सत्यशोधक चळवळीच्या मार्गदर्शक ठरतात.

**तानुबाई बिर्जे**

तानुबाईंचे शिक्षण सावित्रीबाईंनी पुण्यात काढलेल्या वेताळ भेटीतील शाळेत झाले. सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते आणि महात्मा फुले यांचे मित्र देवराव कृष्णराव ठोसर यांची ती कन्या होत. त्यांच्यावर स्त्री-पुरुष समतेचे आणि वर्णजाती स्त्रीदास्यविरोधी विचारांचे संस्कार झाले होते. त्यांचा जन्म १८७६ चा असून विवाह १७ व्या वर्षी सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते वासुदेव बिर्जे यांचे सोबत झाला. त्यानंतर सत्यशोधक समाजाचे मुखपत्र 'दीनबंधू' हे त्यांनी १९०३ मध्ये पुन्हा सुरू केले. पतीच्या निधनानंतर 'दीनबंधू' वृत्तपत्राची जबाबदारी त्यांनी स्वतः हातात घेतली. त्यांचे वयाच्या ३७ व्या वर्षी १९१३ मध्ये मुंबईला तानुबाईंचे निधन झाले. त्या भारतातील पहिल्या स्त्री संपादिका होत.

याशिवाय सावित्रीबाई रोडे, डॉ. रखमाबाई राऊत, लक्ष्मीबाई विचारे, लक्ष्मीबाई नायडू यांचा प्रामुख्याने समावेश आहे. त्यानंतर १९०० ते १९५० पर्यंत सत्यशोधक चळवळीत ज्या स्त्रियांनी महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. त्यामध्ये विमलताई देशमुख, जनाबाई मेहरे, शकुंतलाबाई कोटमकर इत्यादी स्त्री कार्यकर्त्यांचा समावेश आहे.

**सत्यशोधक अधिवेशने (१९११- १९३०)**

नैसर्गिक आपत्तीमुळे व प्लेगच्या साथीमुळे सत्यशोधक चळवळीचे कार्य काही प्रमाणात मंदावले होते. परंतु सावित्रीबाईच्या निधनानंतर डॉ. यशवंतराव फुले हे सत्यशोधक चळवळीचा वर्धापन दिन कार्यक्रम घेत असत. ते पलटणीसोबत परदेशात गेल्यामुळे वर्धापन दिनाचे कार्य बंद पडले होते. त्यानंतर यशवंतरावांचे १३ ऑक्टोबर १९०६ रोजी निधन झाल्याने पुण्यात सत्यशोधक भास्करराव जाधव यांनी लिहिलेल्या लेखांनुसार 'वेदोक्त प्रकरणातून' या कालखंडात प्रचंड ऊर्जा निर्माण झाली. इ. स. १९०५ मध्ये नोकरीचा राजीनामा देऊन सत्यशोधकी पत्र 'दीनबंधू' त्यांनी पुन्हा सुरू केले. सत्यशोधक समाजाचे पहिले अधिवेशन दिनांक १७ एप्रिल १९११ भवानी पेठ पुणे येथे आयोजित करण्यात आले. अधिवेशनाचे अध्यक्षपदी स्वामी रामय्या व्यंकय्या अय्यावारू हे होते. या अधिवेशनात कार्यकारिणी तयार करण्यात आली व नियम व प्रतिज्ञा तयार करण्यात आली. हे नियम व प्रतिज्ञा सत्यशोधक समाजासाठी दिशादर्शक ठरली आहेत. १९११ ते २०१८ पर्यंत सत्यशोधक समाजाची ३९ अधिवेशने संपन्न झाली. **(उगले, स.च.स.इ.,पृ.३३४-३६३)**

**सत्यशोधक वृत्तपत्रे:**

मराठी वृत्तपत्र सृष्टीचा विचार करता दर्पण १८३२ मध्ये मुंबई येथून प्रकाशित झाले. बाळशास्त्री जांभेकर मराठी वृत्तपत्र सृष्टीचे आद्य पत्रकार आहेत. सत्यशोधकी पत्राचा आढावा घेतल्यास दीनमित्र व विविध सत्यशोधकी वृत्तपत्रांनी सत्यशोधकी विचार तळागाळातील मागासवर्गीयांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला.

**स्वातंत्र्योत्तर काळातील सत्यशोधक चळवळ –**

सन १९५८ ते १९७१ हा कालखंड फारच कठीण होता. या कालखंडात भारताला स्वातंत्र्य मिळाले होते त्यामुळे बहुतांशी सत्यशोधक कॉंग्रेस पक्षात सामील होवून राजकारणाच्या दिशेने वाटचाल करीत होते. चळवळीतील महत्वाचे नेते, प्रामुख्याने गुरुवर्य केशवराव विचारे यांच्या सत्यशोधक सहकार्यानी आणि कोल्हापूर येथील सत्यशोधकांनी सत्यशोधक चळवळीचे अस्तित्व अबाधित ठेवले. याच कालखंडात पुन्हा सत्यशोधक अधिवेशनास प्रारंभ झाला. या काळात सत्यशोधक समाजाची १९ अधिवेशने संपन्न झाली.

सत्यशोधकीय साहित्यावर विस्तृत प्रकाश पडावा, हा हेतू लक्षात घेवून सत्यशोधक समाजातील सक्रिय कार्यकर्त्यांच्या मदतीने सत्यशोधकीय साहित्य संमेलने आयोजित करण्यात आली होती. त्यासाठी सत्यशोधक साहित्य परिषदेची स्थापना करण्यात आली. त्यामध्ये महाराष्ट्राच्या सर्व विभागातून पदाधिकारी निवडून एक कार्यकारिणी तयार करण्यात येवून उपरोक्त सदस्यांचा त्यात समावेश करण्यात आला आहे.

परिषदेद्वारे पहिले सत्यशोधक साहित्य संमेलन लातूर येथे सन २००३ मध्ये आयोजित करण्यात आले होते. या पहिल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून साहित्य संस्कृती आणि संशोधन परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. आ. ह साळुंखे होते. त्यानंतर राज्याच्या विविध भागात अधिवेशने संपन्न झालीत. अधिवेशनांचे अध्यक्ष स्थान अनेक मान्यवर साहित्यिकांनी भूषविले आहेत.

आधुनिक काळातील भास्करराव जाधव, दीनमित्रकार मुकुंदराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख, काशीराम बापूजी देशमुख, पंढरीनाथ पाटील, नारायणराव अमृतकर, आनंदस्वामी, दलपत सिंह चव्हान, दिनकरराव जवळकर, केशवराव जेधे, प्रबोधनकार केशव, सीताराम ठाकरे, रा. ना. चव्हाण, प्रा. र. धो. कर्वे इत्यादी सत्यशोधकांचा समावेश आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात रायभान जाधव, व्यंकटराव रणधीर, वसंतराव फाळके, डॉ. बाबा आढाव, नागेशभाऊ चौधरी, प्रा. मा.म. देशमुख व हरि नरके, उत्तमराव पाटील, जी.ए.उगले, दौलतराव गोडे, नलिनी लढके, ॲड. एकनाथराव साळवे, डॉ. आ.ह. साळुंखे, प्रा. हरी नरके, डॉ. एस.एस. भोसले, डॉ. संभाजी खराट, डॉ. श्रीराम गुंदेकर, सतीश जामोदकर, श्याम मुडे, ॲड. सुभाष निकम, वामनराव लोखंडे, डॉ. पी.डी. जगताप, दत्तात्रय यादव, अण्णासाहेब पाटील, गजानन देशमुख, अप्पाराव मैंद, आदी सत्यशोधकांनी चळवळीची धूरा सांभाळली आहे. **(उगले, स.च.स.इ. पृ. ८१० ते ८२७)**

प्रमुख सत्यशोधकांमध्ये डॉ. बाबा आढाव, भारत पाटणकर, स्मृतिशेष बा. ह. कल्याणकर, प्रा. प्रल्हाद लुलेकर, प्रा. श्याम मानव, प्रा. गणेश हलकारे, हरिश देशमुख, जेष्ठ सत्यशोधक महादेवराव चतारे, डॉ. सीमा साखरे, डॉ. रूपा कुलकर्णी बोधी, प्रा. प्रतिमा परदेसी, गेल आम्व्हेट, अरुणा सबाणे, मधुकर वाघमारे, हरिकिसन हटवार, डॉ. अशोक चोपडे, सुनिल सरदार, प्रा. जैमिनी कडू, प्रा. प्रभाकर पावडे, प्रा. डॉ. सतीश पावडे, डॉ. संजय शेंडे, इत्यादी सत्यशोधकाचा समावेश आहे. तर सत्यशोधकी विचार घेवून काम करणाऱ्यांमध्ये मराठा सेवा संघाचे संस्थापक ॲड. पुरुषोत्तम खेडेकर, मधुकरराव मेहकरे, गंगाधर बनबरे, डॉ. श्रीमंत कोकाटे, संभाजी ब्रिगेडचे सुधांशू मोहोड, ॲड. मनोज आखरे, जिजाऊ ब्रिगेडच्या, डॉ. लीना निकम, मयुरीताई देशमुख, स्वाती शेंडे, जया देशमुख, अनिता ठेंगरे आदींचा समावेश आहे. यासोबतच अ.भा.अंधश्रद्धा निर्मूलन समिती, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती व विद्रोही साहित्य परिषद या संघटना सत्यशोधकी विचार समाजापर्यंत पोहचवत आहे.

सत्यशोधकी विचार घेवून काम करणाऱ्या महाराष्ट्रातील महिलांमध्ये नूतन माळवी, शैल जैमिनी, प्रा. संध्या राजूरकर, संध्याताई सराडकर, डॉ. स्मिता मेहत्रे, छायाताई सावरकर, मीराताई मदनकर, डॉ. छायाताई महल्ले, पुष्पाताई चौधरी, वंदना वनकर, सुनीता काळे, शुभांगी घाटोळे/मेश्राम, जेबुनिस्सा शेख, रजिया सुल्ताना इत्यादी स्त्री विचारवंत व कार्यकर्त्या विविध चळवळीमध्ये सक्रिय आहेत. तात्पर्य, स्त्री-मुक्ती चळवळ आणि विविध परिवर्तनवादी चळवळीस सत्यशोधकी विचारांमुळेच बळ मिळाले आहे.

**चळवळीसमोरील आव्हाने आणि उपाय :**

सत्यशोधक चळवळीने महात्मा फुलेंच्या मार्गदर्शनाखाली धर्मवाद, कर्मकांड, स्त्री-पुरुष समानता, शेतकऱ्यांचे प्रश्न, पुरोहितशाहीविरुद्ध संघर्ष केला. त्या मूल्यांचे पुनरुज्जीवन होण्याची भीती निर्माण झाली आहे. आजमितीस विषमतावादी मूल्यांचा भारतीय ज्ञान परंपरेच्या नावाखाली नवीन शिक्षण पद्धतीत समावेश होणे, हे आव्हान सत्यशोधक चळवळीसमोर उभे ठाकले आहे. जर यापूर्वी सत्यशोधकी मानवतावादी विचार अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहचले असते, तर सत्यशोधकी विचार मानसिक पातळीवर रूजला असता.

सत्यशोधक चळवळीचा विचार भारतीय ज्ञान परंपरेत मोडत असल्याने 'निर्मिकाचा धर्म सत्य आहे एक, भांडणे अनेक कशासाठी' हा दृष्टिकोन विचारात घेणे आवश्यक आहे. त्यासाठी भारतीय संविधानाला अभिप्रेत जातविरहित समताधीष्टित समाजव्यवस्था निर्मितीसाठी नविन शिक्षण पद्धतीतील 'भारतीय ज्ञान परंपरा' याअंतर्गत सत्यशोधकी मूल्यांचा समावेश करणे आवश्यक आहे. तेव्हाच 'एकमय समाजा'चे ध्येय साकार होईल.

**निष्कर्ष :**

१) २४ सप्टेंबर १८७३ रोजी 'सत्यशोधक समाज' स्थापन करुन चातुर्वर्ण्य व जातीव्यवस्थेची चिकित्सा केली.
२) स्त्री-शुद्रातिशूद्र, शेतकरी-शेतमजूर, कामगार यांना न्याय मिळवून देण्यासाठी सत्यशोधकीय चळवळीचे सक्रिय योगदान.
३) सत्यशोधक चळवळीने 'माणूस' केंद्रबिंदू मानून व्यापक लढा उभारला.
४) संवादी शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, नवे तंत्रशिक्षण आणि वैचारिक शिक्षण पद्धतीची प्रेरणा दिली.
५) महात्मा फुलेंनी त्यांच्या सत्यशोधकी साहित्यातून सत्यशोधक चळवळीला गती दिली.
६) बुद्धीनिष्ठ, विवेकनिष्ठ, विज्ञाननिष्ठ आणि वस्तूनिष्ठ विचारांची चिकित्सादृष्टी दिली.
७) एकमय लोक व राष्ट्र (Nation) ही संज्ञा दिली.
८) सत्यशोधक चळवळीने पुरस्कृत केलेली समता, स्वातंत्र्य, बंधूता व न्याय ही चतु:सुत्री भारतीय संविधानात प्रतिबिंबित झालेली आहे.
९) सत्यशोधक चळवळीची 'विश्वकुटुंब' संकल्पना 'भारतीय ज्ञान परंपरा' यात मोडते.

**संदर्भ सूची :**

१) संविधान भारताचे, संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, यांच्याद्वारे भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित २०१४
२) उगले, सत्यशोधक चळवळीचा समग्र इतिहास, प्रकाशक: सचिव म.रा.सा. आणि संस्कृती मंडळ, प्रभादेवी, मुंबई-४००२५, पृष्ठ-१४७१४८
३) कीर धनंजय: महात्मा जोतिराव फुले, प्रकाशक: हर्ष भटकळ, पाप्युलर प्रकाशन प्रा.लि. मुंबई-२६, पाचवी आवृत्तीः २०१८, पुनर्मुद्रण २०१४/१९३४, पृ. २१ ते २४
४) नरके, हरी (संपा): महात्मा फुले समग्र वाङ्मय महात्मा जोतीराव फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई, प्रथमावृत्ती:२०१३
५) भोळे, भास्कर लक्ष्मणः महात्मा जोतीराव फुले, प्रकाशक: साहित्य अकादमी ३५, फिरोजशाह रोड, नवी दिल्ली-०९, प्रथमावृत्तीः १९९६ पृ. ४४
६) साळुंखे, आ.ह. महात्मा फुले आणि शिक्षण, प्रकाशक: राकेश अण्णासाहेब साळुंखे, लोकायत, १३ यशवंत नगर, गेंडामाळ, सातारा-०२, प्रथमावृत्ती, सप्टेंबर २०१३
७) ऑम्व्हेट, गेल! जोतीबा फुले आणि स्त्री-मुक्तीचा विचार, प्रकाशक! लोक वाङ्मय गृह, २५ सयानी रोड, मुंबई-२५, सातवी आवृत्ती मार्च २०१२
८) माळी, मा,गो. सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय, प्रकाशक सचिव, महाराष्ट्र राज्य, साहित्य आणि संस्कृती मंडळ, नवीन प्रशासन भवन, मुंबई-३२, द्वितीय आवृत्ती! मार्च १९९८
९) माळवी, नूतनः लेकी भूमीच्या, प्रकाशक! डॉ. अशोक चोपडे, कॅन्डीड प्रकाशन, लक्ष्मीनगर, सेवाग्राम रोड, वर्धा, तृतीय आवृत्तीः २८ नोव्हेंबर २०१२
१०) निकम, लीनाः शौर्यसम्राज्ञी, प्रकाशकः शशीपाल भोवते, सीवली पब्लिकेशन, ३-१, रोड नं. ४, द्वारकापुरी लेआऊट, नागपूर, प्रथमावृत्ती: ८ मे २०२२
११) लुलेकर, प्रल्हादः बहुजन संस्कृतीचे जनक: महात्मा जोतीराव फुले, प्रकाशक: बाळासाहेब धोंगडे, अक्षरवाङ्मय प्रकाशन: बेनकरनगर, धायरी, पुणे - ४११०४१
१२) बगाडे, उमेश: महात्मा जोतीराव फुले, प्रकाशक: यशोधन (येशु) पाटील, शरद पब्लिकेशन्स ए २०३, जनकल्याण (प.), मुंबई - ४०००९१, पहिली आवृत्ती: २८ नोव्हेंबर २०२२
१३) चोपडे, अशोकः विदर्भातील सत्यशोधक चळवळीचे साहित्य, प्रकाशकः प्रा. नूतन माळवी, लक्ष्मीनगर वर्धा-०१, प्रथमावृत्तीः २८ नोव्हेंबर २००३
१४) Mohenjo-Daro and Indus Civilization, By Sir John Mashall १९२२-२७, Publication: Originally Published in London by Arther Probsthain in १९३१ (Digital Library of India) reprinted by Asian Educational Services २००४